**<u>वादी तर्फे साक्षीदार क्रमांक ०४ ची साक्ष</u>**

**मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,**

**<u>अधिकचा सरतपास शपथेवर वादीचे विधीज्ञ श्री. जी.जे.गिरकर यांचे मार्फत.</u>**

०५. आता मला अभिलेखावर दाखल असलेले नि.क्र. ४/११ वरील दि. १७/०६/२०१७ रोजीचे खरेदीखताची सहीसुद नक्कल दाखविण्यात आली. सदर खरेदीखत वसंत अच्युत्त प्रभुगावकर यांनी परेश सहदेव बागवे यांना करुन दिलेले आहे. त्यावर वसंत अच्युत्त प्रभुगावकर यांची सही, अंगठा व फोटो तसेच परेश सहदेव बागवे यांची सही, अंगठा व फोटो आहे. तसेच साक्षीदार नामे गौतमी वसंत प्रभुगावकर व स्वप्नील विजय सांडव यांचे सहया आहे. सदर दस्ताची मुळ प्रत प्रतिवदी क्र. १ च्या ताब्यात आहे. सबब, मी दुय्यम पुरावा म्हणून सदर खरेदीखताची सहीसुद नक्कल मुळ वादीने यांनी दाखल केलेली आहे. त्यास **<u>नि.क्र. ६९</u>** देण्यात येते.

०६. आता मला अभिलेखावर दाखल असलेले नि.क्र. ४/१२ वरील दि. १९/०६/२०१७ रोजीचे खरेदीखताची सहीसुद नक्कल दाखविण्यात आली. सदर खरेदीखत वसंत अच्युत्त प्रभुगावकर, गौतमी वसंत प्रभुगावकर यांनी परेश सहदेव बागवे यांना करुन दिलेले आहे. त्यावर वसंत अच्युत्त प्रभुगावकर, गौतमी वसंत प्रभुगावकर यांची सहया, अंगठा व फोटो तसेच परेश सहदेव बागवे यांची सही, अंगठा व फोटो आहे. तसेच साक्षीदार नामे अन्सार गफूर शेख व गणेश प्रकाश मयेकर यांचे सहया आहे. सदर दस्ताची मुळ प्रत प्रतिवदी क्र. १ च्या ताब्यात आहे. सबब, मी दुय्यम पुरावा म्हणून सदर खरेदीखताची सहीसुद नक्कल मुळ वादीने यांनी दाखल केलेली आहे. त्यास **<u>नि.क्र. ७०</u>** देण्यात येते.

०७. आता मला अभिलेखावर दाखल असलेले नि.क्र. ७३/१ वरील दाखल

असलेल्या कुलमुखत्यारपत्राची प्रमाणित प्रत दाखविण्यात आली. सदर कुलमुखत्यारपत्र हे वादी विश्वास विजय परब यांनी मला करुन दिलेले आहे. त्यावर वादी यांची सही, अंगठा व फोटो आहे तसेच त्यावर माझी, अंगठा व फोटो आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. सदरचे कुलमुखत्यारपत्र हे नोटरी आर.के.परुळेकर यांचेकडे अ.क्र. १२६/२०२५ दि. ०३/०३/२०२५ रोजी नोंदविण्यात आलेले आहे. मुळ प्रत ही नियमित दिवाणी दावा क्र. ७५/२०१७ मध्ये दाखल असल्याने मी या प्रकरणात हजर करु शकलेलो नाही. त्यास **नि.क्र. ७४** देण्यात येते.

सरतपास पूर्ण.

प्रतिवादी तर्फे विधिज्ञ श्री. एस.एन.पई यांना वारंवार पुकारा केला असता ते गैरहजर. सबब, प्रतिवादीतर्फे उलट तपासाकरीता प्रकरण तहकूब करण्यात येते.

श्रवणोत्तर स्वीकृत

ठिकाण : मालवण
दिनांक : १७/०६/२०२५

मोहम्मद कैसर फकीह
दिवाणी न्यायाधीश (क–स्तर), मालवण.